# मिसरामधील कालवरी



एड्रियन एबेन्स

# मिसरामधील कालवरी

एड्रियन एबेन्स

May, 2025

हे पुस्तक भाऊ जोएल सालवी ह्यांनी मराठीत
भाषांतरित केले आहे.

मोशेसाठी जळणाऱ्या झाडीतून परमेश्वराचा आवाज ऐकणं हे नक्कीच एक अद्‌भुत अनुभव होता, पण परमेश्वर त्याच्याकडून जे काम करवून घेण्याची तयारी करत होता— ते म्हणजे इस्राएली लोकांना मिसर देशातून सोडवणं—हे त्याच्या समजण्यापलीकडचं होतं! असं शक्य तरी कसं होणार?

परमेश्वराने त्याला सांगितलं की काय होणार आहे आणि तो त्या परिस्थितीशी कसा सामना करणार आहे.

निर्गम *3:18–20:* तुझे सांगणे ते ऐकतील*;* मग तू आणि इस्राएलाचे वडील जन मिसर देशाच्या राजाकडे जा व त्याला सांगा, इब्र्यांचा देव परमेश्वर आम्हांला भेटला आहे*;* तर आमचा देव परमेश्वर ह्याला यज्ञ करावा, म्हणून आम्हांला तीन दिवसांच्या वाटेवर रानात जाऊ द्यावे*;* पण मला ठाऊक आहे की, मिसर देशाचा राजा तुम्हांला जाऊ देणार नाही*;* त्याला भुजप्रताप दाखवल्या-शिवाय तो जाऊ देणार नाही. मग मी आपला हात पुढे करून मिसर देशात ज्या सर्व अद्‌भुत कृती करणार त्यांचा मारा मी त्याच्यावर करीन*;* मग तो तुम्हांला जाऊ देईल*;*

पण हे सगळं पाहता एक विचित्र गोष्ट लक्षात येते—मोशेने मिसर देश सोडून गेल्यावर ४० वर्षं झाली होती, आणि तो तिथून पळून गेला होता कारण त्याने एक अशी गोष्ट केली होती जी परमेश्वरच आता करणार आहे असं दिसतं.

निर्गम *2:11–12:* काही दिवसांनी असे झाले की मोशे मोठा झाल्यावर त्याने आपल्या भाऊबंदांकडे जाऊन त्यांचे काबाडकष्ट पाहिले*;* त्या प्रसंगी आपल्या भाऊबंदांपैकी एका इब्र्याला कोणी मिसरी मारत असलेला त्याला दिसला. तेव्हा त्याने इकडेतिकडे सभोवार नजर फेकली व कोणी नाही असे पाहून त्या मिसऱ्यास ठार करून त्याला वाळूत लपवले.

जर परमेश्वरच मिसरी लोकांवर आपला हात उगारणार असेल, त्यांच्या गुराढोरांचा नाश करणार असेल, त्यांच्यावर गारांचा वर्षाव करणार असेल आणि त्यांच्या प्रथम जन्मलेल्या मुलांना मारणार असेल, तर मग मोशेने एका मिसरी माणसाचा वध करून जे केलं, ती एक सुरुवात करून दिली असं म्हणता येईल का?

पण पाहा, हे प्रेरणादायक लेखन काय सांगतं:

“मोशेने मिसरी माणसाला ठार मारल्यामुळे तो त्याच्या पूर्वजांनी वारंवार केलेल्या चुकांमध्येच अडकला होता—ते म्हणजे परमेश्वराने जे काम स्वतः करायचं ठरवलं होतं, ते त्यांनी स्वतःच्या हातात घेण्याची चूक केली. देवाची योजना इस्राएल लोकांची मुक्तता युद्धाद्वारे करायची नव्हती, जसं मोशेला वाटलं, तर स्वतःच्या सामर्थ्याने—ज्यायोगे सर्व महिमा केवळ देवालाच मिळावा. तरीसुद्धा, या उतावळ्या कृतीलाही देवाने आपल्या उद्दिष्टासाठी उपयोगी ठरवलं. मोशे अजूनही आपल्या महान कार्यासाठी सिद्ध नव्हता. त्याला अजूनही अब्राहाम आणि याकोबने शिकलेला तोच धडा शिकायचा होता—की मनुष्याच्या सामर्थ्यावर किंवा शहाणपणावर नाही, तर केवळ देवाच्या सामर्थ्यावर आणि त्याच्या वचनावर विश्वास ठेवूनच त्याच्या आश्वासनांची पूर्तता होते.” — Patriarchs and Prophets, पृ. 247

आपण यामधून नेमकं काय समजून घ्यावं? आपण का मानतो की मोशेने मिसऱ्याला ठार मारणं चूक होतं, पण देवाने त्यांना ठार करणं मात्र योग्य आहे?

या टप्प्यावर अनेक लोक उत्तर देतात, “आपण देवाच्या कृतींवर प्रश्न नाही विचारला पाहिजे तो देव आहे, आणि गोष्टी तशाच असतात.” पण असं उत्तर दिल्याने या प्रश्नाचं खरं उत्तर मिळत नाही—की देव नेमका प्रेमळ कसा आहे? आणि या कृतीत सातत्य किंवा न्याय कसा आहे? हा एक गंभीर प्रश्न आहे ज्याला स्पष्टता लागते.

जर आपण पुन्हा एकदा हे वचन वाचले, तर असं वाटतं की देव फारोला इस्राएली लोकांना सोडण्यास भाग पाडण्यासाठी ताकद वापरणार आहे.

निर्गम *3:19–20:*

पण मला माहीत आहे की, बलवान हाताने दबाव आणल्याशिवाय इजिप्तचा राजा तुम्हाला जाऊ देणार नाही. म्हणून मी आपला हात लांब करेन व माझ्या चमत्कारांनी इजिप्तवर प्रहार करेन. मग शेवटी तो तुम्हाला जाऊ देईल.

हा “बलवान हात” म्हणजे नक्की काय? सरळपणे वाचल्यास असं वाटतं की देव खरंच फारोला जबरदस्तीने त्यांना सोडायला लावणार आहे. मग असं चित्र तयार होतं का की देव फारोचा गळा पकडून त्याला भिंतीवर आदळतो आणि म्हणतो, “माझ्या लोकांना सोडून दे!”? जर असंच करायचं होतं, तर मग विनंती करण्याचा सगळा प्रकार का? मोशेने सरळ जाऊन का सांगू नये, “आम्ही निघत आहोत. जो कोणी अडवायचा प्रयत्न करेल त्याला मारलं जाईल!”

तुम्ही जर शास्त्र वाचलं असेल, तर तुम्हाला जाणवलं असेल की यात एक स्पष्ट विरोधाभास दिसतो—एकीकडे देव बळाचा वापर करताना दिसतो, तर दुसरीकडे त्याचा

पुत्र येशू असं म्हणतो:

मत्तय *5:39:*

पण मी तुम्हाला सांगतो, दुष्ट मनुष्याला प्रतिकार करू नका. तुमच्या एका गालावर कोणी चापट मारली तर दुसराही गाल पुढे करा.

लूक *9:54–56:*

तेव्हा त्याचे शिष्य याकोब व योहान हे पाहून म्हणाले, "हे प्रभू, एलीयाने केले होते तसेच आकाशांतून अग्नीने पडून त्याचा नाश करावा म्हणून आम्ही आज्ञा करावी, अशी तुझी इच्छा आहे काय?" परंतु त्याने वळून त्यांना धमकावले आणि म्हटले, "तुम्ही कोणत्या आत्म्याचे आहात हे तुम्हास ठाऊक नाही; कारण मनुष्याचा पुत्र मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला नाही, तर त्यांना तारायला आला आहे." मग ते दुसऱ्या गावाला गेले.

मग आपण हे सगळं कसं जुळवून घेऊ? जेव्हा येशू म्हणतो...

योहान *14:10*

मी पित्यामध्ये व पिता माझ्यामध्ये आहे, असा विश्वास तू धरीत नाहीस काय? ज्या गोष्टी मी तुम्हास सांगतो, त्या मी आपल्या मनाच्या सांगत नाही; माझ्यामध्ये राहणारा पिता स्वतःची कामे करतो.

योहान *5:19*

यावरुन येशूने त्यांना उत्तर दिले; "मी तुम्हास खरे खरे सांगतो, पुत्र पित्याला जे काही करताना पाहतो त्यावाचून काहीही त्यास स्वतः होऊन करता येत नाही; कारण तो जे काही करतो ते पुत्रही तसेच करतो.

मग आपण या स्पष्ट विरोधाभासाचं काय करू? जेव्हा एखाद्या आपत्तींचं वर्णन केलं जातं, तेव्हा स्तोत्रकार असं म्हणतो:

स्तोत्र *78:43–49*

ज्या दिवशी त्यांनी इजिप्तमध्ये आपली चिन्हे प्रदर्शित केली, सोअनाच्या प्रदेशात त्यांनी चमत्कार केले. त्यांनी त्यांच्या नद्यांच्या पाण्याचे रूपांतर रक्तात केले; त्यामुळे त्यांच्या जलप्रवाहातील पाणी पिता आले नाही. सर्व इजिप्त देश खाऊन टाकण्यासाठी त्यांनी कीटकांचे थवेच्या थवे पाठविले आणि बेडकांनी सर्व विध्वंस करून टाकले. त्यांनी त्यांची पिके सुरवंटांना खावयास दिली; त्यांचा हंगाम टोळांनी फस्त केला.

त्यांनी गारांनी त्यांच्या द्राक्षवेलींचा आणि उंबराच्या झाडांचा बर्फाने नाश केला. त्यांनी त्यांची गुरे गारांनी नष्ट केली, विजेने त्यांची मेंढरे ठार झाली. त्यांनी त्यांच्यावर आपला तीव्र राग, क्रोध, संताप आणि शत्रुत्व— आणि नाश करणारा देवदूतांचा एक गट सोडला.

या वचनामध्ये आपत्तींच्या घटनांना "नाश करणारा देवदूतांच्या" कार्याशी जोडण्यात आलं आहे. या उताऱ्यात “वाईट, भ्रष्ट, व नाश ” साठी वापरलेलं हिब्रू शब्द “ra’im” (רעים) हेच शब्द मूळचे आहेत, जसे: “चांगल्या आणि वाईट” च्या झाडाबाबत (उत्पत्ति 3:5) वापरलेलं ra (רַע) आणि जेव्हा देवाने नोहाच्या काळात पृथ्वी पाहिली, तेव्हा ती “भ्रष्ट” झाली होती, तेव्हा वापरलेलं ra’at (רָעַת) (उत्पत्ति 6:5)

काही लोक या गोष्टीवरून सुटकेचा श्वास घेतात आणि म्हणतात, “हे सगळं देवाने केलं नाही, तर सैतान आणि दुष्ट देवदूतांनी केलं.” पण हे उत्तर या विरोधाभासाला सोडवतात असं नाही तर, उलट ते अधिक गुंतागुंतीचं करतात—जणू सैतान देवाच्या नोकरशाहीत आहे. ज्यावेळी देवाला एखादं कठीण काम करायचं असतं, तेव्हा तो ह्या “दैवी गुंडाला” कामावर लावतो?

आपल्याकडे सरकार अनेकदा असंच करत नाही का? जेव्हा त्यांना एखादा कडक कायदा रेटून द्यायचा असतो, तेव्हा ते गुप्तचर यंत्रणेला (जणू 'चोर-पोलिस' खेळासारखं) एखादी घटना घडवायला सांगतात—अशी घटना की जी ऐकून जनतेला भीती वाटावी आणि मग तीच जनता ‘संरक्षण द्या’, ‘कठोर कायदे आणा’ असं ओरडायला लागते. जणू एखाद्या सीरियलमध्ये जिथे एक पोलीस प्रेमळ आणि दुसरा कडक असतो—एक आपला वाटतो आणि दुसरा भीतीदायक! किंवा अगदी आपल्या पौराणिक गोष्टींसारखं, जिथे राम समजावतो, आणि श्याम धडकतो! मग प्रश्न असा आहे—बायबल खरंच असा 'काळा आणि पांढरा सापशिडीचा पट' आहे का? की आपण त्याच्या मुखपृष्ठावर ‘शुभ-अशुभ’ यांचं चिन्ह लावावं?
इथेच काही लोक एका मोठ्या फसवणुकीत अडकतात. त्यांना असं वाटतं की नाश करणारी शक्ती ही देवाची नसून शत्रूची म्हणजेच सैतानाची आहे. देवाला दोषमुक्त ठरवायचा मोह खूपच आकर्षक वाटतो. पण ज्याप्रमाणे हवेने देवाच्या वचनात स्वतःहून भर घालून चूक केली, त्याचप्रमाणे आपणही तेच करत असतो. देवाने फक्त एवढंच सांगितलं होतं की "त्या झाडाचं फळ खाऊ नका." पण हवेनं त्यात भर घालत सांगितलं की "हात लावूही नका." आणि जेव्हा तिनं फळ हातात घेतलं आणि काहीच वाईट घडलं नाही, तेव्हा तिला वाटलं की देव चुकलेला आहे. पण तिचीच समजूत चुकीची होती.

"देव कशाचाही नाश करत नाही" असं म्हणणं खूप धोकादायक आहे. असं मानायचं झालं तर बायबलमध्ये स्पष्टपणे सांगितलेल्या अनेक गोष्टींकडे दुर्लक्ष करावं लागतं. यामुळे देव स्वतःच स्वतःचं निर्दोषपणा सिद्ध करायला लागतो—जसं हवेनं स्वतःवरचं दोष टाळण्यासाठी सगळं सापावर ढकललं.

शास्त्र काय सांगतं ते बघा:

उत्पत्ती *6:7* — म्हणून परमेश्वर म्हणाला, *"*मी उत्पन्न केलेल्या मानवास पृथ्वीतलावरून नष्ट करीन*;* तसेच मनुष्य, पशू, सरपटणारे प्राणी, व आकाशातील पक्षी या सर्वांचा मी नाश करीन, कारण या सर्वांना उत्पन्न केल्याचे मला दुःख होत आहे*."*

असं वचन वाचल्यावर तुम्ही काय कराल? त्याचा गूढ किंवा रूपक अर्थ लावून टाळून टाकताल काय? जर आपल्याला खरंच बायबल हे देवाचं वचन वाटत असेल, तर इथे एक खोल संघर्ष उभा राहतो—तो इतका असह्य होतो की तो सहन करणं कठीण वाटतं. पण खरं काय? नव्याने जन्म घेण्यासाठी असा संघर्ष होणं आवश्यक असतं.

आपल्याला हे समजून घ्यायला इतकं कठीण का जाते? कारण आपल्या मनात फार पूर्वीपासून एक खोटं बी रुजलेलं आहे ते म्हणजे "तूम्ही खरोखर मरणार नाही." हीच ती सापाची लबाडी आहे, जी त्याने आपल्या पित्यांना सांगितली. यामुळे आपल्या मनात अशी कल्पना निर्माण झाली की देवाशिवायही अजून एक शक्ती अस्तित्वात आहे. जर देवाशिवायही एखादी शक्ती असती, तर आपण देवाशिवायही जगू शकलो असतो. हीच सापाची खोटी शिकवण माणसाच्या मनात दोन स्वतंत्र शक्तींचं—चांगली आणि वाईट— करण्याची कल्पना रुजवते. पण असं मानलं, तर मिसर देशातील संकटांमागे कोण जबाबदार आहे हे समजणं अधिकच गुंतागुंतीचं होतं. सृष्टी आपल्याला काय शिकवते? अंधार किंवा थंडी स्वतःहून निर्माण होत नाहीत—ते फक्त प्रकाश आणि उष्णता नसल्यामुळे निर्माण होतात. अंधार ही कुठलीही स्वतंत्र शक्ती नाही—तो फक्त प्रकाश नाकारल्यावर तयार होतो.

मत्तय *6:22-23*

डोळा शरीराचा दिवा आहे. म्हणून जर तुमचे डोळे निर्दोष असतील तर तुमचे संपुर्ण शरीर प्रकाशमय होईल. पण जर तुमचे डोळे सदोष असतील, तर तुमचे संपुर्ण शरीर अंधकारमय होईल. जर तुम्हाठायी असणारा प्रकाश हा वास्तविक अंधकार आहे, तर खरोखरचा अंधार किती असणार*!*

येशूने हे स्पष्टपणे सांगितले आहे की जर तुझ्यातील प्रकाशच अंधार असेल, तर तो अंधार किती मोठा असेल! येशू हा तो प्रकाश आहे जो जगात येणाऱ्या प्रत्येक माणसाला प्रकाशित करतो. (योहान 1:9) जर आपण हा सत्य प्रकाश अधर्मात दडपून टाकतो (रोम 1:18), तर खरोखरच ख्रिस्त पुन्हा एकदा क्रूसावर खिळला जातो (इब्री 6:6), म्हणजे माणसांनी ख्रिस्ताच्या सामर्थ्याने जगावे. (योहान 14:23)

सर्पाने सांगितलेल्या खोट्याच्या विरोधात, संपूर्ण विश्वात फक्त एकच सामर्थ्य आहे.

स्तोत्र *62:11 –* देव एकदा बोलला आहे, मी दोनदा ऐकले आहे, सामर्थ्य देवाचे आहे*.*

रोम *13:1 –* प्रत्येक मनुष्याने आपल्यावर असलेल्या अधिकाऱ्यांच्या अधीन रहावे, कारण देवाकडून नाही असा अधिकारी नाही*;* आणि जे आहेत ते देवाकडून नेमलेले आहेत*.*

प्रेषित *17:25 –* आणि त्यास काही उणे आहे*,* म्हणून मनुष्यांच्या हातून त्याची सेवा घडावी असेही नाही*;* कारण जीवन प्राण व सर्वकाही तो स्वतः सर्वांना देतो*.*

संपूर्ण सृष्टीवर देवाचा स्पर्श दिसून येतो. निसर्ग देवाची साक्ष देतो. जो मनुष्य भानावर आहे, व जो या विश्वातील चमत्कार आणि गूढतेशी भिडतो, तो अनंत सामर्थ्याच्या कार्याला ओळखल्याशिवाय राहू शकत नाही. जग आपल्या अंतर्गत शक्तीने नव्हे, तर देवाच्या कृपेने आपले अन्न निर्माण करते, आणि वर्षानुवर्षे सूर्याभोवती फिरते. दृश्यात नसलेला एक हात, ग्रहांना त्यांच्या मार्गावर नेतो. एक गूढ जीवन सर्व निसर्गात भरलेले आहे – असे जीवन जे संपूर्ण विश्वातील असंख्य जगांना आधार देते, जे उन्हाच्या झुळुकीत तरंगणाऱ्या कीटकात आहे, जे पाखरांना उडायला मदत करते आणि गोंधळलेल्या कावळ्याला अन्न देते, जे कळीतून फुल फुलवतो आणि फुलातून फळ निर्माण करतो. जी शक्ती निसर्गाला आधार देते, तीच शक्ती माणसातही कार्यरत आहे*.* जशी एकच नियमव्यवस्था ताऱ्यांना व अणूंना चालवते, तशीच ती मानवी जीवनालाही नियंत्रित करते. हृदयाची गती, रक्तप्रवाहाचे नियमन करणारे नियम – हे सर्व त्या परिपूर्ण बुद्धीमत्तेचे नियम आहेत, ज्याच्या अधीन आत्मा आहे*.* संपूर्ण जीवन त्याच्याचकडून मिळते*.*

– एलन व्हाईट*, Education*, पृष्ठ *99*

सर्व सामर्थ्य देवाकडूनच आहे*, "*देव एकदा बोलला आहे, मी दोनदा ऐकले आहे, सामर्थ्य देवाचे आहे*." (*स्तोत्र *62:11) "*देवाशिवाय कोणतेही सामर्थ्य नाही*." (*रोम *13:1) –* हे वाक्य पूर्णपणे खरे आहे, ह्यात कुठलाही अपवाद नाही. रोम साम्राज्य – जरी निर्दय आणि क्रूर नेरोच्या काळात असले*,* तरी त्यालाही देवाकडूनच सामर्थ्य प्राप्त झालेले होते*,* अगदी जसे दाविदाच्या काळातील यहूदी सामर्थ्य होते. जेव्हा पिलात येशूला म्हणाला की "माझ्याकडे तुला वाचवायचे की क्रूसावर खिळवायचे असे दोन्ही अधिकार आहेत*,"* तेव्हा येशू उत्तर देतो*: "*आपणाला तो अधिकार वरून दिलेला नसता तर माझ्यावर मुळीच चालला नसता*" (*योहान *19:11) – E. J. Waggoner, Present Truth,*

*March 21, 1895*

आपण प्रेरणादायक वचनातून हे जाणतो की – "सामर्थ्य देवाचेच आहे." *(स्तोत्र 62:11; रोम 13:1)* तो सर्व गोष्टींना "आपल्या सामर्थ्याच्या वचनाने" टिकवून धरतो. *(इब्री 1:3)* तो सर्वांना जीवन, श्वास व सर्व काही देतो, आणि "आपण त्याच्यामध्ये जगतो, हालचाल करतो, व अस्तित्वात राहतो." जगातील सत्ता म्हणजे देवाचेच सामर्थ्य आहे – परंतु ते पापामुळे भ्रष्ट झालेले आहे . निर्मात्याने माणसाची मुक्त इच्छा इतकी मान्य केली आहे की तो त्याला अशा गोष्टी करण्याची शक्ती देतो ज्या दैवी इच्छेविरुद्ध आहेत. अर्थात, ही शक्ती मर्यादित असते; पण जेव्हा माणूस देवाच्या इच्छेनुसार कार्य करतो, तेव्हा त्याला अमर्याद शक्ती दिली जाते. देवाची ही अमर्याद शक्ती पवित्र आत्म्याद्वारे प्रकट होते. म्हणूनच देवाच्या कार्याविषयी लिहिले आहे – "न बळाने, न सामर्थ्याने, तर माझ्या आत्म्याद्वारे होईल, असे प्रभु म्हणतो." *– A. T.* जोन्स, *American Sentinel,* ऑगस्ट *25, 1898*

टीप: A.T. जोन्स यांचे वरील शब्द विचारपूर्वक पाहावेत –

*"जगातील सत्ता म्हणजे देवाचे सामर्थ्य, परंतु पापामुळे ते विकृत झाले आहे. निर्मात्याने माणसाची मुक्त इच्छा इतकी सन्मानित केली आहे की तो त्याला दैवी इच्छेविरुद्ध वागण्याची शक्तीही देतो. मात्र ही शक्ती मर्यादित असते."*

हेच विचार ईयोबाच्या काळातील देव व सैतान यांच्यातील संवादालाही संदर्भ देतात.

ईयोब *1:8-12*

परमेश्वर सैतानास म्हणाला, "तू माझा सेवक, ईयोब याच्याकडे लक्ष दिलेस काय? पृथ्वीत त्याच्यासारखा सरळ आणि सात्विक, देवभिरू व दुष्टतेपासून दूर राहणारा असा कोणीही मनुष्य नाही." नंतर सैतानाने परमेश्वरास उत्तर दिले आणि म्हणाला, "ईयोब देवाचे भय ऊगीच बाळगतो काय? तू त्याच्या भोवती, त्याच्या घरासभोवती, आणि त्याच्या सर्वस्वाच्या प्रत्येक बाजूस कुंपण घातले आहेस ना? तू त्याच्या हातांच्या कामांस यश दिले आहेस, आणि भूमीत त्याचे धन वाढत आहे. पण जर तू आपला हात पुढे करून त्याच्याजवळ असणाऱ्या सर्वस्वावर टाकशील तर तो आत्ताच तुझ्या तोंडावर तुझा त्याग करील." परमेश्वर सैतानास म्हणाला, "पाहा, त्याचे सर्व जे काही आहे ते तुझ्या अधिकारात आहे, फक्त त्यास तुझ्या हाताचा स्पर्श करू नको." मग सैतान परमेश्वरापुढून निघून गेला.

सैतान असं का म्हणतो की, "तू आपला हात पुढे करून त्याच्याजवळ असणाऱ्या सर्वस्वावर टाकशील" — तो असं का म्हणत नाही की "मी त्याला त्रास देतो"?

कारण सैतानाला स्वतःहून कोणालाही त्रास देण्याची मुभा नाही. तो फक्त देवाची परवानगी असेल, तेव्हाच काही करू शकतो. सैतान देवाच्या संरक्षणाखाली असलेल्या कुणालाही हात लावू शकत नाही. याचा अर्थ असा की सामर्थ्य केवळ देवाकडे आहे —

आणि देवाशिवाय कुठलंच सामर्थ्य अस्तित्वात नाही. हेच सिद्ध करणारा मोशेच्या काठीचं व कोड्याचं चिन्ह आहे.

निर्गम *4:1* — मग मोशेने उत्तर दिले, *"ते माझ्यावर विश्वास ठेवणार नाहीत व माझे म्हणणे ऐकणार नाहीत; ते म्हणतील, परमेश्वराने तुला दर्शन दिलेलेच नाही."*

जे पुढे घडतं, ते काही साधं जादूचं कर्तृत्व नाही. या चिन्हांमधून आपण एक खोल,अतिमहत्त्वाचं सत्य पाहतो — फारोह इस्राएलला का सोडतो हे केवळ बाह्य गोंधळामुळे किंवा दबावामुळे नाही, तर एक अंतर्गत कृती घडते. या गोष्टीमध्ये पुढे जाण्याआधी, देवाच्या राज्याचं तत्त्व समजून घेऊया:

ख्रिस्ताच्या कार्याचा हा भाग नाही की तो माणसांना जबरदस्तीने स्वतःला स्वीकारायला भाग पाडेल. सैतान आणि त्याच्या आत्म्याने प्रेरित झालेले लोकच विवेकावर सक्ती लादण्याचा प्रयत्न करतात. *(येशूचे जीवन, 487)*

पृथ्वी देवाविषयीच्या गैरसमजामुळे अंधकारमय झाली होती. हा अंधार हलका करण्यासाठी, आणि जग पुन्हा देवाकडे वळवण्यासाठी, सैतानाच्या फसवणुकीच्या सामर्थ्याला मोडून काढणं आवश्यक होतं. पण हे बलपूर्वक करता येत नव्हतं. सक्तीचा वापर देवाच्या राज्याच्या तत्वांना विरोधी आहे; देव केवळ प्रेमाने केलेली सेवा स्वीकारतो; आणि प्रेम सक्तीने निर्माण होत नाही; ते जबरदस्तीने किंवा अधिकाराने मिळवता येत नाही. फक्त प्रेमानेच प्रेम जागृत होतं. देवाला ओळखणं म्हणजे त्याच्यावर प्रेम करणं; आणि देवाचा स्वभाव सैतानाच्या स्वभावाच्या विरोधात स्पष्टपणे उभा राहिला पाहिजे. *(येशूचे जीवन, 22)*

देव कोणालाही सक्तीने अधीन करत नाही, ना तो कोणालाही ठार मारून आज्ञाधारक बनवतो. ही पद्धत दुष्टाची आहे — जो सर्वांना ठार मारतो जे "पशूचे खूण" स्वीकारत नाहीत.

आता आपण मोशेने दिलेले पहिलं उदाहरण पाहू.

निर्गम *4:2-5* —

परंतु परमेश्वर मोशेला म्हणाला, *"तुझ्या हातात ते काय आहे?"* मोशेने उत्तर दिले, *"काठी आहे."* मग देव म्हणाला, *"ती जमिनीवर टाक."* तेव्हा मोशेने तसे केले; आणि त्या काठीचा साप झाला. तेव्हा मोशे घाबरला व त्यापासून पळाला. परंतु परमेश्वर मोशेला म्हणाला, *"तुझा हात पुढे कर व त्याचे शेपूट धर."* तेव्हा त्याने तसे केले, आपला हात पुढे करून त्यास धरले. तेव्हा त्याच्या हातात ती पुन्हा काठी झाली. *"म्हणजे ह्यावरून ते विश्वास धरतील, त्यांचा पूर्वजांचा-अब्राहामाचा देव, इसहाकाचा देव व याकोबाचा देव परमेश्वर याने तुला दर्शन दिले आहे."*

काठी किंवा दंड म्हणजे सामर्थ्याचं चिन्ह आहे. राजेशाही भाषेत याला "राजदंड" (Sceptre) म्हणतात.

ख्रिस्त, देवाचा पुत्र, याच राजदंडाचा धनी आहे.

इब्री *1:8* — पुत्राविषयी तर तो असे म्हणतोः हे देवा, तुझे राजासन सदासर्वकाळासाठी आहे, आणि तुझे राज्य युगानुयुगीचे आहे आणि *"तुझा राजदंड न्यायीपणाचा राजदंड आहे."*

ख्रिस्तालाच या राजदंडाचं रूप मानलं गेलं आहे.

गणना *24:17* — मी त्यास पाहीन, पण तो आता इथे नाही. मी त्याच्याकडे पाहीन, पण तो जवळ नाही. याकोबातून एक तारा बाहेर येईल, आणि इस्राएलातून एक राजदंड निघेल. तो मवाबाच्या नेत्यांना चिरडून टाकील आणि शेथाच्या सर्व मुलांचा तो नाश करील.

ख्रिस्त म्हणजे देवाचं सामर्थ्य आहे (1 करिंथ 1:24) आणि तो देवाच्या उजव्या हाताला आहे (इब्री 1:3). त्याला आपण "देवाचा उजवा हात" किंवा आपल्याच भाषेत "उजव्या हाताचा माणूस" असं म्हणतो.

निर्गम *15:6* — *"हे परमेश्वरा, तुझा उजवा हात आश्चर्यकारकरीत्या बलशाली आहे; त्या हाताने तू शत्रूंचा चुराडा करून टाकलास."*

देव मोशेला सांगतो की तो देवाचं प्रतिनिधित्व करेल, आणि अहरोन त्याचा प्रवक्ता असेल (निर्गम 4:16).

जेव्हा मोशेने आपली काठी खाली सोडली आणि ती जमिनीवर पडली, तेव्हा ख्रिस्तामधील सामर्थ्य सापासारखं झालं. ख्रिस्त म्हणजे देवाचं सामर्थ्य आहे. जेव्हा देव सैतानाला म्हणतो, "पहा, त्याचं सर्व काही तुझ्या अधीन आहे" (ईयोब 1:12), तेव्हा देव आपली काठी जमिनीवर टाकतो. ती काठी म्हणजे ख्रिस्त, ज्याला सैतान आपली उद्‌दिष्टं साध्य करण्यासाठी वापरतो — अगदी जसं सैतानाने रोमी सैनिकांना प्रेरित केलं की त्यांनी ख्रिस्ताला कालवरीच्या डोंगरावर क्रूस वाहून नेण्यासाठी जबरदस्ती केली.

याचा शांतपणे विचार करा. रोमी सैनिकांचं मन सैतानाच्या ताब्यात असतं, तरीही त्यांच्या शरीरात चालणारं श्वास — त्यांच्या आयुष्याचा श्वास — तोच आहे जो प्रत्येक माणसाला जीवन देतो. माणसाच्या अंत:करणात कार्यरत असलेलं ख्रिस्ताचं सामर्थ्यच सैतान वापरतो — आणि त्याच सामर्थ्याचा उपयोग करून ख्रिस्ताला क्रूसावर ठोकतो. थोडा वेळ थांबून याचा विचार करा: एका रोमी सैनिकाचा तो एक क्षण — जेव्हा तो हातात हातोडा घेऊन ख्रिस्ताच्या पवित्र हातांमध्ये खिळा ठोकतो — हेच दृश्य मिसरवरील आपत्ती आणि पृथ्वीवर दिसणाऱ्या सर्व विनाशक शक्तींचं मूळ समजून घेण्यासाठी एक 'गुरुकिल्ली' ठरते. हीच ती काठी आहे जी जमिनीवर पडते:

मार्क *14:35* — त्यांच्यापासून थोडे दूर अंतरावर जाऊन तो जमिनीवर पडला आणि त्याने प्रार्थना केली की..

जिथे कुठे माणूस विनाशक शक्तीमुळे जमिनीवर कोसळतो, तिथे तीच काठी पडलेली आहे — आणि ती सर्पात रूपांतरित होते.

मार्क *9:20* — *नंतर त्यांनी मुलाला येशूकडे आणले आणि जेव्हा त्या दुष्ट आत्म्याने येशूकडे पाहिले तेव्हा लगेच त्या मुलाला पिळून टाकले आणि तो जमिनीवर पडून तोंडाला फेस आणून लोळू लागला.*

म्हणून आपण हे ओळखू शकतो की जिथे कुठे माणसाचं दु:ख दिसतं, तिथे आपल्याला हे सत्य सापडतं:

यशया *63:9* — *त्यांच्या सर्व दु:खात, तो पण दु:खी झाला आणि त्याच्या समक्षतेच्या दुतांने त्यांना तारले. त्याने आपल्या प्रेमाने व आपल्या करूणेने त्यांना वाचवले, आणि त्याने सर्व पुरातन दिवसात त्यांना उचलून वाहून नेले.*

जेव्हा मोशेने काठी खाली टाकली आणि ती सापात रूपांतरित झाली, तेव्हा ख्रिस्त त्याला क्रूसाबद्दल शिकवत होता. अधिक सुस्पष्टपणे सांगायचं तर, तो खांब आहे किंवा काठी आहे ज्यावर साप ठेवलेला आहे.

गणना *21:8* — *परमेश्वर मोशेला म्हणाला, एक पितळेचा साप कर आणि तो खांबावर ठेव. साप चावल्यानंतर जर एखाद्याने खांबावरच्या पितळेच्या सापाकडे पाहिले तर तो मनुष्य मरणार नाही.*

अग्नी सर्प हा प्राचीन सर्प आहे, ज्याला सैतान आणि दुष्ट साप म्हणतात (प्रकटीकरण 12:9). खांबावर असलेला साप म्हणजे सैतान, जो ख्रिस्ताच्या सामर्थ्याचा उपयोग करून आपले स्वतःचे उद्दिष्ट साधण्यासाठी त्याचा वापर करतो.

आता आपण A.T. Jones यांचे शब्द सैतानाच्या क्षेत्रात पुन्हा सांगतो.

सैतानी सामर्थ्य हे देवाचं सामर्थ्य आहे, जे पापामुळे विकृत झालं आहे. सृष्टीचा निर्माता शैतानाच्या स्वतंत्र इच्छेचा इतका आदर करतो की, त्याला देवाच्या इच्छेच्या विरोधात काहीतरी करण्यासाठी सामर्थ्य देतो. ह्या सामर्थ्याचं मात्र एक मर्यादित स्वरूप आहे; A.T. Jones, अमेरिकन सेन्सिनल, 25 ऑगस्ट, 1898. एडॅप्टेड.

येशू आपल्याला सांगतो:

योहान *3:14* — *जसा मोशेने अरण्यात पितळेचा सर्प उंच केला होता तसे मनुष्याच्या पुत्रालाही उंच केले पाहिजे*

हे खरे तर त्या अग्निसर्प असलेल्या खांबावरच्या सर्पाकडे निर्देश करतं, पण ही एकमेव जागा नाही जिथे वाळवंटात साप उचलला गेला.

निर्गम *4:4* — *परंतु परमेश्वर मोशेला म्हणाला, "तुझा हात पुढे कर व त्याचे शेपूट धर." तेव्हा त्याने तसे केले, आपला हात पुढे करून त्यास धरले. तेव्हा त्याच्या हातात तो*

पुन्हा काठी झाली.

मोशेला सापाचे शेपूट पकडावं लागलं. शेपूट हा सापाचा शेवटचा भाग असतो. देवाने सापाला सांगितले:

उत्पत्ति *3:15 — "*तुझ्यामध्ये व स्त्रीमध्ये आणि तुझ्या बीजामध्ये व स्त्रीच्या बीजामध्ये मी शत्रूत्व ठेवीन. तो तुझे डोके ठेचील आणि तू त्याची टाच फोडशील*."*

ख्रिस्ताचे पाय जखमी झाले. मोशेने सापाचे शेपूट पकडले. हे क्रूसाचे प्रतीक आहे, ज्यामुळे देवाचे सामर्थ्य पुन्हा काठीसारखे बदलले आणि ते मोशेच्या हातात परत आले, ज्याने देवाचे प्रतिनिधित्व केले.

*2* करींथ *5:21 —* कारण जो पाप जाणत नव्हता त्यास त्याने आपल्यासाठी पाप असे केले, म्हणजे आपण त्याच्याठायी देवाचे नीतिमत्त्व असे व्हावे.

ख्रिस्ताने पाप होण्यास तयार होऊन त्याचं सामर्थ्य सैतानाच्या हातात दिलं. सैतानाला त्याचं राज्य प्रकट करायला परवानगी मिळावी म्हणून, ख्रिस्ताचं सामर्थ्य सैतानाच्या इच्छेनुसार वापरलं गेलं. म्हणूनच ख्रिस्ताचे व्यक्तिमत्व आणि त्याचे सामर्थ्य सर्व दुष्ट दूतांच्या आत आहे. ते येशूचे व्यक्तिमत्व त्याच्या कडवटपणामुळे क्रूसावर चढवतात. आणि हेच आदमाच्या मुलामुलीसोबत होतं. ख्रिस्त त्या लोकांच्या आत वारंवार नवीन रीत्या वधस्तंभावर चढवला जातो, जे लोक स्वतःला ख्रिस्तापेक्षा महत्त्वाचं मानतात.

ख्रिस्ताचे सामर्थ्य मिसरी लोकांच्या आत्म्यात वास करत होता. कोणत्याही व्यक्तीला मारणे म्हणजे ख्रिस्ताच्या व्यक्तिमत्त्वाची यातना करणे. तुम्ही कल्पना करू शकता का, एक मिसर देशातील आई तिच्या मृत मुलाला जवळ घेऊन आक्रोशाने रडत आहे? येथे ख्रिस्त तिच्या दुःखात भाग घेत आहे, येथे वधस्तंभ उचलला जात आहे आणि ख्रिस्त पुन्हा वधस्तंभावर चढवला जात आहे. जेव्हा देवसैतानाला त्याच्या पुत्राचे सामर्थ्य घेण्याची संधी देतो, तेव्हा तो स्वतःचे डोळे बाहेर काढून टाकतो.

स्तोत्र *78:50 — "*त्याने आपल्या रागासाठी मार्ग सपाट केला*;* त्याने त्यांना मरणापासून वाचविले नाही पण त्याने त्यांना मरीच्या हवाली केले*."*

हे वचनामध्ये मिसरमधील दंडाची चर्चा होते. यामध्ये देव म्हणतो की त्याने त्याच्या रागाचा मार्ग सपाट केला. त्याचा प्रिय पुत्रात त्याचे आनंद आहे. मिसरी लोकांना नाश करणाऱ्याच्या हातून मरण येऊ दिल्याने, देवाने त्याच्या पुत्राची वेदना आणि दुःख सहन करण्याची परवानगी दिली. आणि म्हणूनच, पिता त्या अंधारात एकटा उभा राहिला आणि त्याच्या पुत्रासाठी आणि त्याच्या पुत्राने जे दुःख भोगलं, त्यासाठी रडला.

देवाने काठीच्या संदर्भात ही सत्यता दुसऱ्या चमत्कारीक कृत्याद्वारे स्थापित केले.

निर्गम *4:6* — मग परमेश्वर त्यास आणखी म्हणाला, *“तू तुझा हात तुझ्या छातीवर ठेव,”* तेव्हा मोशेने आपला हात आपल्या छातीवर ठेवला*;* मग त्याने आपला हात बाहेर काढला तेव्हा तो कोडाने बर्फासारखा पांढरा झाला*;*

देवाचा पुत्र हा पित्याचा उजवा हात आहे. तर मग, देवाचा पुत्र कुठे राहतो?

योहान *1:18* — देवाला कोणीही कधीहि पाहिले नाही. जो देवाचा एकुलता एक पुत्र पित्याच्या उराशी असतो त्याने त्यास प्रकट केले आहे*.*

जेव्हा देवाने आपल्या हृदयात हात घालून ज्या ठिकाणी त्याचा पुत्र होता त्या ठिकाणी स्पर्श केला — तेव्हा त्याचा पुत्र आपल्यासाठी पाप करण्यात आला. कुष्ठरोग हे बायबलमध्ये पापाचं प्रतीक आहे, आणि अशी हाताची अवस्था म्हणजे ख्रिस्ताचं सामर्थ्य, पण त्याच्या आत्म्याशिवाय. (याकोब 2:26) जेव्हा आत्मा नसतो, तेव्हा शरीर निर्जीव होते  — त्याला काहीही जाणवत नाही. ख्रिस्त सैतानामुळे जगात आलेल्या मृत्यू आणि विनाशामुळे आतून सुन्न झाला. त्याला आत्मिक वेदनेतुन एक असा कडवट प्याला प्यावा लागला, जो सहन करणे कठीण होते.

ख्रिस्ताच्या यातना आणि वधस्तंभाची छाया आपल्याला मिसरमधील पहिल्या संकटातही दिसते. मोशे आणि अहरोन यांना परमेश्वराने सांगितलं की त्यांनी ती काठी घ्यावी — जी सापात रूपांतरित झाली होती. ती काठी म्हणजे ख्रिस्ताचं सामर्थ्य, जी आता सैतानाच्या हाती दिली गेली होती.

निर्गम *7:15* —  उद्या सकाळी फारो नदीवर जाईल*;* तू साप झालेली काठी बरोबर घे आणि नदीच्या काठी त्यास भेटण्यास उभा राहा*.*

निर्गम *7:19* — परमेश्वराने मोशेला म्हटले*,* तू अहरोनाला सांग की*,* आपली काठी घेऊन मिसर देशामधील नद्यांवर*,* नाल्यावर*,* त्यांच्या तलावावर व त्यांच्या सर्व पाण्याच्या तळ्यावर आपला हात उगार म्हणजे त्या सर्वांचे रक्त होईल*,* घरातील लाकडांच्या व दगडांच्या भांड्यात रक्तच रक्त होईल*.”*

येशू जेव्हा बागेत प्रार्थनेत होता, तेव्हा त्याचा घाम रक्ताच्या थेंबासारखा जमिनीवर पडत होता. थोड्याच वेळात, जेव्हा त्याला पकडायला जमाव आला, तेव्हा त्याने त्यांना म्हटले: *"*परंतु ही तुमची वेळ आणि अंधाराची सत्ता आहे*.” (*लूक *22:53)*

जशी ती काठी पाण्यावर उचलली गेली, तसाच येशू लोकांसमोर उचलला गेला — छळ आणि मृत्यू भोगण्यासाठी. पाणी हे लोकांचं प्रतीक होतं, पण त्याचबरोबर ते ख्रिस्ताच्या आत्म्याचही प्रतीक होतं. जशी ती काठी पाण्यावर आदळली गेली, तसंच ख्रिस्त सैतानाच्या ताब्यात देण्यात आला — आणि शिष्यांना जसं आधीच सांगितलं

गेलं होतं, त्याचप्रमाणे पळून गेले.

मत्तय २६:३१

तेव्हा येशू त्यांना म्हणाला, "तुम्ही सर्व ह्याच रात्री माझ्याविषयी अडखळाल; कारण असा शास्त्रलेख आहे की, 'मी मेंढपाळाला मारीन आणि कळपातल्या मेंढरांची दाणादाण होईल.'

संपूर्ण पाण्याचं रक्तात रूपांतर होणं याचा अर्थ असा आहे की, तेथील पुरुष आणि स्त्रिया यांच्या आत्म्यांशी संबंधित मिसरदेशात ख्रिस्ताच्या आत्म्याला तीव्र वेदना व त्रास सहन करावा लागत होता. हे फक्त मिसर देशाच्या लोकांपुरतंच मर्यादित नव्हतं, तर इस्राएलच्या लोकांनाही यात सामाविष्ट केलं गेलं होतं. हा प्रसंग त्या भविष्यातील आक्रोशाचं प्रतिबिंब दाखवतो—जो देवाच्या लोकांच्या तोंडून निघाला होता: "त्याचे रक्त आमच्यावर व आमच्या मुलाबाळांवर असो." (मत्तय २७:२५)

ही पहिली आपत्ती हे दाखवते की, देवाने स्वतःच्या पुत्राला शत्रूच्या ताब्यात दिलं, आणि त्याच्या सामर्थ्याच्या मर्यादेत सैतानाला मिसरी लोकांवर विनाश आरंभ करण्याची मुभा दिली. सैतानाने त्यांना इतकं अधर्म आणि मूर्तिपूजेमध्ये गुरफटून घेतलं होतं की त्यांचा अधर्माचा प्याला भरून वाहत होता. सैतान सतत देवाकडे त्यांचा न्याय मागत होता.

मिसरी लोकांनी योसेफाच्या बुद्धिमत्तेला तुच्छ मानलं आणि देवाने त्यांच्यावर दाखवलेल्या दयेला म्हणजेच दुष्काळातून त्यांचं रक्षण करण्याच्या अहवानाकडे दुर्लक्ष केलं. तो दुष्काळ म्हणजे एक प्रकारचा इशारा होता, की मानवाने देवाच्या आज्ञा आणि आदेश पाळण्याचं नाकारल्यामुळे त्याच्यावर संकट येत आहे.

अनुवाद ११:१३-१७

मी ज्या आज्ञा आज तुम्हांला देत आहे त्या तुम्ही तत्परतेने ऐकाल आणि आपला देव परमेश्वर ह्याच्यावर प्रेम कराल आणि पूर्ण मनाने व पूर्ण जिवाने त्याची सेवा करीत राहाल, तर मी तुमच्या देशावर आगोटीचा पाऊस आणि वळवाचा पाऊस योग्य समयी पाठवीन; म्हणजे तुला आपले धान्य, द्राक्षारस व तेल ह्यांचा साठा करता येईल. मी तुझ्या गुराढोरांसाठी तुझ्या कुरणात गवत उपजवीन व तुला पोटभर खायला मिळेल. तुम्ही सावध राहा, नाहीतर मनाला भुरळ पडून तुम्ही बहकून जाल, अन्य देवांची सेवा करू लागाल आणि त्यांना नमन कराल. तसे केले तर परमेश्वराचा कोप तुमच्यावर भडकून तो आकाश बंद करील, म्हणजे पाऊस पडणार नाही; भूमी आपला उपज देणार नाही; आणि जो उत्तम देश परमेश्वर तुम्हांला देत आहे त्यातून तुमचा त्वरित नायनाट

होईल.

मिसर देशामधील दुष्काळाचा वेळ हे याचं संकेत होतं की, लोकांनी देवाच्या सार्वभौमत्वाला नाकारलं, त्याच्या आज्ञा न पाळता अधर्माच्या वाटेवर गेले, म्हणून देवाचा आत्मा मागे घेतला जात होता. मिसरी लोकांना देवाच्या आज्ञा आणि नियम समजून घेण्याची संधी अब्राहामामार्फत मिळाली होती. त्यांनी अब्राहामाला भेट दिली होती आणि जेव्हा त्यांनी त्याच्याशी संबंधित देवाच्या नियमांचा अपमान केला, तेव्हा त्याचा परिणाम त्यांनी पाहिला होता.

पाऊस हा विशेषतः शब्बाथ दिनांशी जोडलेला होता.

लेवीय *26:2-4* — *तुम्ही माझे शब्बाथ पाळावेत आणि माझ्या पवित्रस्थानाविषयी पूज्यबुद्धी बाळगावी; मी परमेश्वर आहे. तुम्ही माझ्या विधींप्रमाणे चालाल आणि माझ्या आज्ञा पाळून त्याप्रमाणे वागाल, तर नेमलेल्या काळात तुमच्याकरता मी पाऊस पाडीन, जमीन आपला उपज देईल व मळ्यातील झाडे आपापली फळे देतील.*

मिसरमध्ये गुलामीमुळे बहुतांश इस्त्राएलांनी शब्बाथ पाळणे थांबवले होते. जर इस्त्राएली शब्बाथ सातत्याने पाळू शकले असते, तर ते पौलासारखे झाले असते ज्याच्या उपस्थितीमुळे जहाज उद्ध्वस्त झाल्यावर सर्व वाचले. त्यांनी मिसर देशाला पश्चात्तापासाठी अधिक वेळ मिळवून दिला असता.

म्हणूनच इस्राएलाने वाळवंटात जाऊन परमेश्वरासाठी सण पाळावा, ही विनंती करण्यात आली होती.

निर्गम *5:1* — *नंतर मोशे व अहरोन फारोकडे जाऊन म्हणाले, "इस्राएलाचा देव परमेश्वर सांगत आहे की, माझ्या लोकांनी माझ्याप्रीत्यर्थ रानात उत्सव1 करावा म्हणून त्यांना जाऊ द्यावे."*

